सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
विद्यार्थी विकास मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७.
डॉ. संतोष परचुरे
संचालक

संदर्भ क्र. विविमं/२०२१–२२/३३५ दिनांक : २२/०४/२०२२

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित
विद्यार्थी विकास मंडळ गट 'ब' व 'क' मधील कार्यशाळा/उपक्रम राबविण्यास मान्यतापत्र प्राप्त
सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था.

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२१–२२ मधील सहशैक्षणिक आणि उपशैक्षणिक गट 'ब' व 'क' निहाय मान्यताप्राप्त कार्यशाळा/उपक्रम राबविण्यास मुदतवाढ.**

महोदय/महोदया,

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ विद्यार्थी विकास मंडळामार्फत संलग्न महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्थामध्ये कला, संस्कृती व साहित्य विषयक सांस्कृतिक कार्यक्रमांतर्गत प्रायोगिक, केवल, अभिव्यक्त, दृक्‌श्राव्य कला प्रकार, इतर पूरक उपक्रम, शिबिरे, कार्यशाळा, चर्चासत्रे, नव उद्योजक शिबिर, लेखन कार्यशाळा, नव लेखक शिबिर, दिव्यांग व विशेष व्यक्ती कार्यशाळा, कौशल्य विकास पूरक उपक्रम, नव उद्योजकता तथा व्यवसाय समुपदेशन, व्यक्तिमत्व विकासपूरक समुपदेशन, सांस्कृतिक आदान–प्रदान कार्यक्रम, शैक्षणिक कार्यशाळा असे विविध कल्याणकारी सहशैक्षणिक आणि उपशैक्षणिक कार्यशाळा/उपक्रम विद्यार्थ्यांकरीता राबविण्यात येतात.

इच्छुक महाविद्यालय/परिसंस्थांच्या प्रस्तावांना अनुसरून विद्यार्थी विकास मंडळामार्फत शैक्षणिक वर्ष २०२१–२२ मध्ये सहशैक्षणिक आणि उपशैक्षणिक गट 'ब' व 'क' निहाय कार्यशाळा/उपक्रम राबविण्यास माहे फेब्रुवारी, २०२२ मध्ये मान्यता देण्यात आली असून सदर मान्यतेनुसार मान्य कार्यशाळा/उपक्रम संबंधित महाविद्यालय व परिसंस्थामध्ये माहे मे, २०२२ पर्यंत राबविण्याबाबत कळविण्यात आले होते. याबाबत सद्यस्थितित चालू शैक्षणिक वेळापत्रक विचारात घेऊन कळविण्यात येते की, विद्यार्थी विकास मंडळाद्वारा **मान्यतापत्र प्राप्त** उपरोल्लेखित शैक्षणिक वर्ष २०२१–२२ करिता माहे फेब्रुवारी, २०२२ मध्ये मान्यता देण्यात आलेल्या ***(कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना, निर्भय कन्या अभियान या व्यतिरिक्त उर्वरित)*** सहशैक्षणिक आणि उपशैक्षणिक **गट 'ब' व 'क' निहाय** कार्यशाळा/उपक्रम राबविण्याकरिताचा कालावधी **माहे ऑगस्ट, २०२२ पर्यंत वाढविण्यात येत आहे**.

शासन व स्थानिक प्रशासनाचे कोविड अनुरूप वर्तनासंबंधी प्रचलित सर्व आदेश या कार्यशाळा/उपक्रमांच्या अंमलबजावणी, कार्यान्वयनास तत्प्रभावाने लागू असतील व याबाबतीत या विभागाकडून स्वतंत्ररित्या कळविण्यात येणार नाही. या कार्यशाळा/उपक्रमांच्या अंमलबजावणीसाठी कार्यशाळा/उपक्रमांच्या प्रचलित सर्व नियम अटींसह कोविड विषयक सर्व प्रचलित आदेशांचे अनिवार्यतेने पालन अत्यावश्यक आहे. सदर पत्राच्या अधिन राहून आपण आपणांस विद्यार्थी विकास मंडळाद्वारा **मान्यतापत्र प्राप्त** उपरोल्लेखित सहशैक्षणिक आणि उपशैक्षणिक गट 'ब' व 'क' निहाय कार्यशाळा/उपक्रम राबविण्याबाबत योग्य ती कार्यवाही करणे व सदर गट 'ब' व 'क' निहाय कार्यशाळा/उपक्रम राबविल्यानंतर सहभागी विद्यार्थ्यांची माहिती, विद्यार्थी अभिप्रायासह तसेच कार्यशाळा/उपक्रमाविषयी स्फूट टिप्पणी, कार्यशाळेचे फोटो, कार्यवाहीचा अहवाल विद्यार्थी विकास मंडळाच्या लिंकवर पुढीलप्रमाणे www.unipune.ac.in - Students Development - BSD Online - College Login - Main Menu - Students' Development - Central Audit - Scheme Proposal FeedBack येथे ऑनलाईन पद्धतीने भरण्याबाबत संबंधितांस अवश्य सूचित करावे. कळावे, ही विनंती.

(डॉ. संतोष परचुरे)
संचालक,
विद्यार्थी विकास मंडळ